**खेड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी डी. जी. म्हस्के)**

==============================================

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १८/२०२५**

**CNR No. MHRT050002282025**

१. **आरीफा मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन खलपे,**
वय सु. ४३ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. सहजीवन हायस्कूल समोर, दापोली रोड,
खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी.

२. **कु. इकरा मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन खलपे,**
वय सु. २१ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,
रा. सहजीवन हायस्कूल समोर, दापोली रोड,
खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी.

३. **कु. मिजान मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन खलपे,**
वय सु. ९ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,
रा. सहजीवन हायस्कूल समोर, दापोली रोड,
खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी.

४. **कु. ईनाया मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन खलपे,**
वय सु. ६ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,
रा. सहजीवन हायस्कूल समोर, दापोली रोड,
खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी.

**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही.** **सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेशन VIII १९२० चे कलम २ अन्वये अर्ज**

=========================================

**उपस्थिती**

अर्जदारतर्फे वकील श्री. एस. एस. थरवळ.

=========================================

# निशाणी १ वरील आदेश
## (जाहीर दिनांक – २३/०४/२०२६)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १९२०,रुल २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील कथनानुसार अर्जदार क्र.१ चे पती, अर्जदार क्र.२ ते ४ चे वडील मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांचे दि.२८/०५/२०२४ रोजी डॉ. परमशेट्टी हॉस्पीटल, मिरज या ठिकाणी निधन झाले आहे. मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांच्या आई खतीजा कासिम खलपे यांचे दि.१६/०७/२०१८ रोजी निधन झालेले आहे व वडील कासिम महमद जाफर खलपे यांचे दि.११/१२/१९९२ रोजी निधन झालेले आहे. मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांच्या नावे मौजे खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी या ठिकाणी मिळकती आहेत. यातील काही मिळकती या जुन्या गुलाममोहीद्दीन कासिम खलपे व काही मिळकती या मुन्ना कासिम खलपे या नावाने आहेत. मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांचे पश्चात सदर मिळकतींना अर्जदार क्र.१ ते ४ यांची नावे दाखल होणे आवश्यक आहेत. मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांना अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत त्यामुळे प्रस्तुत अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मिळावा म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**३.** प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या मागणीविषयी 'दै. रत्नागिरी टाईम्स' या वर्तमानपत्रामध्ये दि.१०/०३/२०२५ रोजी जाहीर नोटिस प्रसिध्द करणेत आली व अर्जदार यांच्या मागणीबाबत कोणाला हरकत, आक्षेप असल्यास त्यांनी न्यायालयासमक्ष हजर होऊन तसा नोंदवावा असे कळविण्यात आले. परंतु, सदरची जाहीर नोटिस प्रसिध्द होवूनही अद्यापपर्यंत कोणीही या अर्जास हरकत, आक्षेप नोंदविलेला नाही. सदर जाहीर

नोटीस प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्राची अस्सल प्रत (नि.१३) याकामी दाखल केलेली आहे. तद्नंतर दिवाणी न्यायालय खेड, नगरपरिषद खेड, ता. खेड आणि तहसिलदार कार्यालय, खेड यांचे सुचना फलकावर जाहीरनामा (नि.०९) प्रमाणे प्रसिध्द करण्यात आला. जाहीर नोटीस (नि.१३) व जाहीरनामा (नि.०९) प्रसिध्द करून कोणीही याकामी हजर होवून अर्जदार यांचे अर्जास आक्षेप घेतलेला नाही.

**४.** अर्जदार क्र.१ यांनी अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ सरतपासाचे शपथपत्र (नि.१४) दाखल केले आहे. तसेच, अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्ठी देण्यासाठी मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांच्या मृत्यु दाखल्याची सहिसूद प्रत, मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांच्या आई खतीजा व वडील कासिम यांच्या मृत्यू दाखल्याच्या छायांकित प्रती, राजपत्राची छायांकित प्रत, अर्जदार यांचे रेशनकार्ड व अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधारकार्डच्या पडताळलेल्या प्रती, अर्जदार क्र.१ व २ यांच्या पॅनकार्डच्या पडताळलेल्या प्रती अशी कागदपत्रे दाखल करून नि.१५ कडील पुरशीसने त्यांचा पुरावा बंद केला आहे.

**५.** अर्ज तसेच अभिलेखावरील सर्व कागदपत्रे पाहिली. अर्जदारतर्फे सन्माननीय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, अभिलेखावर दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि अर्जदारचे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत मी खालीलप्रमाणे मांडत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार पात्र आहेत काय ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २. | अंतिम आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ करीताः–</u>**

**६.** अर्जदार यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्रामध्ये मुळ अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. अभिलेखावर दाखल असणारी कागदपत्रे ही त्याचे कथनांशी सुसंगत आहेत. त्यामुळे अर्जदार यांचे कथनांना बळकटी आली आहे. अभिलेखावर दाखल नि.७ कडील मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांचे मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता ते दि.२८/०५/२०२४ रोजी डॉ. परमशेट्टी हॉस्पीटल, मिरज या ठिकाणी मयत झाल्याचे दिसून येते. मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांचे अर्जदार क्र.१ ते ४ यांचेशी असलेले नातेसंबंध अर्जदार क्र.१ यांनी शपथेवर कथन केले आहेत. त्यांचेमधील नातेसंबंध कुणीही नाकारलेले नाहीत. मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांना अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नसलेबाबतची कथने आजपावेतो कोणीही आव्हानीत किंवा खंडीत केलेली नसल्याने ती अबाधित राहिली आहेत.

**७.** एकंदरीत अभिलेखावरील कागदपत्रे ही अर्जदार यांनी त्यांचे अर्जात केलेल्या कथनास पृष्ठी देतात. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून अर्जदार यांचे कथनांवर विश्वास ठेवू नये असा कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. जाहीर नोटीस (नि.१३) व जाहीरनामा (नि.९) प्रसिध्द करूनही याकामी अर्जदार यांचे कथनांस कोणीही विरोध दर्शवून ती खंडीत केलेली नाहीत. वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. यास्तव अर्जदार यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र अर्जदार क्र.१ ते ४ यांचे नावे देणे न्यायोचित ठरेल. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत

आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः–**

८. वर नमुद केलेल्या विवेचनावरून मी मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) अर्जदार क्र.१ ते ४ यांना योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर त्यांच्या नावे देण्यात यावे.

३. अर्जदारांनी सिव्हील मॅन्युअलचे परिच्छेद ३ १२ च्या तरतुदीप्रमाणे मयत मुन्ना उर्फ गुलाममोहीद्दीन कासिम खलपे यांचे नावावरील सर्व मालमत्तांची यादी दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो.)

Digitally signed by MHASKE DADA GOPINATH
Date: 2026.04.23 17:21:50 +0530

**(डी. जी. म्हस्के)**

**दिनांक – २३/०४/२०२६**

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | Civil M.A. No. 18/2025 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Clerk | : | Shri. J. D. Ambekar |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC Court, Khed |
| Date of Decision | : | 23.04.2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 23.04.2026 |
| Order uploaded on | : | 23.04.2026 |